Scan QR code to visit ... Epaper Portal

दैनिक

# सह्याद्रीचा राखणदार

www. sahyandrinews.com

• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

Scan QR code to visit ... Epaper Portal

• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ ले • अंक २३५ • Title - Code :- MAHMAR49513 • बुधवार दि.५ जून २०२४ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

## थोडक्यात

### बीडचे नवनिर्वाचित खासदार बजरंग सोनवणे यांच्या गाडीला अपघात

**बीड**–बीड लोकसभा मतदारसंघातून भाजपच्या ज्येष्ठ नेत्या पंकजा मुंडे यांचा पराभव करणारे शरदचंद्र पवार गटाचे उमेदवार बजरंग सोनवणे यांच्या गाडीचा अपघात झाला आहे. वास्तविक विजयानंतर बजरंग सोनवणे हे मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांच्या भेटीसाठी जात होते. या वेळी हा अपघात झाला. या अपघात त्यांच्या ताफ्यातील अनेक कार्यकर्ते जखमी झाले असल्याची माहिती समोर आली आहे. वास्तविक शहागड पुलाजवळ त्यांच्याच ताफ्यातील एक गाडी बजरंग सोनवणे यांच्या गाडीला धकडल्याने हा अपघात झाला आहे.बीड लोकसभा मतदार संघातून पंकजा मुंडे आणि भाजपला मोठा धक्का देत बजरंग सोनवणे यांनी विजय मिळवला आहे. त्यांच्या या विजयात मनोज जरांगे पाटील यांचा मोठा वाटा मानला जातो. बीडमध्ये मराठा समाजाची निर्णायक मते मनोज जरांगे यांच्या माध्यमातून बजरंग सोनवणे यांच्या पारड्यात गेल्यानेच त्यांचा हा विजय झाला असल्याची चर्चा आहे. त्यामुळेच विजयी झाल्यानंतर लगेचच त्याच रात्री बजरंग सोनवणे हे मनोज जरांगे पाटील यांच्या भेटीसाठी निघाले होते. मात्र, रस्त्यातच त्यांच्याच ताफ्यातील एका दुसऱ्या वाहनाने सोनवणे यांच्या गाडीला जोरदार धडक दिली. मात्र, त्यानंतरही बजरंग सोनवणे यांनी आंतरवाली सराटी येथे जात मनोज जरांगे पाटील यांची भेट घेतली.


### भविष्यात चित्र बदलण्याची आपल्यात ताकद

**मुंबई**–राष्ट्रवादी काँग्रेस आणि महायुतीला राज्यात अपेक्षित यश मिळू शकले नसले तरी, भविष्यात हे चित्र बदलण्याची ताकद आपल्यात असल्याचा दावा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केला आहे. अपयशाने खचून न जाता नव्या उत्साहाने, उमेदीने सर्व कार्यकर्त्यांनी पुन्हा एकदा स्वत:ला लोकसेवेला वाहून घ्यावे आणि आगामी विधानसभा निवडणुकीच्या कामाला लागण्याच्या सूचना देखील अजित पवार यांनी केल्या आहेत. या संदर्भात त्यांनी एका पोस्टच्या माध्यमातून कार्यकर्त्यांचे अभिनंदन केले आहे.

### इंडिया आघाडीही सरकार स्थापन करण्याच्या शर्यतीत

**मुंबई**–सर्वसामान्य माणसाने सर्वसामान्य माणसाची ताकद काय असते दाखवून दिली आहे. सत्तेत असणारे कितीही मस्तवाल झाले तरी त्यांना त्यांची जागा एका बोटाने दाखवून देऊ शकतो, हे या निवडणुकीत दिसून आले असल्याचे म्हणत उद्धव ठाकरे यांनी लोकसभा निवडणुकीच्या निकालावर पहिली प्रतिक्रिया दिली आहे. इंडिया आघाडीने सत्ता स्थापनेचा दावा केलाच पाहिजे, असे देखील उद्धव ठाकरे यांनी म्हटले आहे. इंडिया आघाडीच्या दिल्लीतील बैठकीसाठी मी दुपारनंतर जाणार असल्याची माहिती देखील उद्धव ठाकरे यांनी दिली आहे.इंडिया आघाडीचा पंतप्रधान पदाचा चेहरा कोण असेल? या बद्दलच उद्याच्या बैठकीत चर्चा होणार असल्याचे उद्धव ठाकरे यांनी म्हटले आहे. आमच्यापैकी कोणीही स्वतः पंतप्रधान पदासाठी इच्छुक असल्याचा मताचा नाही. केवळ देशाचे संविधान वाचायला हवे, हुकूमशाही पासून देशाला वाचवायला हवे, हीच भावना घेऊन इंडिया आघाडीतील सर्व घटक पक्ष एकत्र आले असल्याचे उद्धव ठाकरे यांनी म्हटले आहे. उद्याच्या बैठकीत पंतप्रधान पदाचा उमेदवार ठरवला जाईल, अशी माहिती देखील उद्धव ठाकरे यांनी दिली आहे.

# केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी मारली विजयाची हॅटट्रिक



**नागपूर (वृत्तसंस्था)–नागपूर लोकसभा मतदार संघातील भाजपाचे उमेदवार आणि केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी विजयाची हॅटट्रिक मारत नितीन गडकरी यांनी ६ लाख ५५ हजार २७ मते मिळविली व प्रतिस्पर्धी उमेदवार काँग्रेसचे आ.विकास ठाकरे यांच्यापेक्षा १ लाख ३७ हजार ६०३ मते अधिक मिळवित विजय प्राप्त केला. कळमना मार्केट यार्डात ०४ जून ला २० चरणांमध्ये झालेल्या मतमोजणीत आ. विकास ठाकरे यांना ५ लाख १७ हजार ४२४ मते मिळाली.**

मंगळवारी सकाळपासून कळमना मार्केट यार्डात मतमोजणीस प्रारंभ झाला. नागपूर लोकसभा मतदार संघातील पूर्व, पश्चिम, उत्तर, दक्षिण, मध्य आणि दक्षिण पश्चिम अशी विधानसभा मतदार संघनिहाय २० चरणात मतमोजणी झाली.
मतमोजणीच्या २० फेर्यांमध्ये दुपारी झालेल्या तीन फेर्या वगळता सर्व फेर्यांमध्ये नितीन गडकरी यांनी आघाडी कायम राखली. मतमोजणीसाठी प्रशासनात उत्तम व्यवस्था केली आणि अतिशय अल्प कालावधीत संपूर्ण मतफेर्या पूर्ण केल्या. मतमोजणीच्या १५ फेर्या आटोपल्यानंतर कार्यकर्त्यांनी प्रथम महाल येथील वाड्यापुढे जल्लोष करण्याचा मानस व्यक्त केला पण त्यानंतर त्यांच्या वर्धा रोड येथील निवासस्थानी कार्यकर्ते गोळा झाले आणि त्यांनी ढोल, ताशे, फटाके मिठाई व हारतुरे यासह विजयी जल्लोष केला, त्याचवेळी नितीन गडकरी आणि कांचन गडकरी यांनी कार्यकर्त्यांच्या भावनांचा आदर करीत त्यांचे आभार देखील मानले.

# काँग्रेस उमेदवार आमदार प्रतिभा धानोरकर विक्रमी मताधिक्याने विजयी

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

चंद्रपूर–वणी–आर्णी मतदार संघातून काँग्रेस उमेदवार आमदार प्रतिभा धानोरकर यांनी २ लाख ६० हजार ४१० इतक्या विक्रमी मताधिक्याने विजय मिळविला. त्यांनी राज्याचे वन, सांस्कृतिक कार्य तथा मत्स्य व्यवसाय मंत्री सुधीर मुनगंटीवार यांचा पराभव केला. धानोरकर यांना ७ लाख १८ हजार ४१० मते मिळाली तर मुनगंटीवार यांना ४ लाख ५८ हजार ४ मते मिळाली. इतर सर्व १३ उमेदवारांची अनामत रक्कम जप्त झाली आहे. धानोरकर या विदर्भात सर्वाधिक मतांनी विजयी झाल्या आहेत. विशेष म्हणजे सहा ही विधानसभा मतदार संघात धानोरकर यांनी मुसंडी मारली असून सर्वच विधानसभा मतदार संघात लाखांच्या वर मताधिक्य मिळविले आहे . तर मुनगंटीवार यांना स्वतःच्या मतदार संघात बरोबरीचे स्थान ही मिळविता आले नाही . २०१९ मध्ये स्वर्गीय खासदार बाळू धानोरकर यांनी केंद्रीय गृहराज्य मंत्री हंसराज अहिर यांना पराभूत केले होते . तर या आधी २०१४ ला राज्याचे कॅबिनेट मंत्री तथा चंद्रपूर



जिल्ह्याच्या पालकमंत्री स्वर्गीय संजय देवतळे यांना पराभूत करून आमदार बनले होते तर नवऱ्याने केलेला रेकॉर्ड कायम ठेवत प्रतिभा धानोरकर यांनी हेविवेट मंत्री सुधीर मुनगंटीवार वर यांना चक्क अडीच लाख मतांनी पराभूत करून नवीन रेकॉर्ड तयार केला आहे . लोकसभा मतदारसंघात मोडणाऱ्या चंद्रपूर आणि यवतमाळ जिल्ह्यांतील सर्व सहाही विधानसभा मतदारसंघात धानोरकर यांना आघाडी मिळाली. या लोकसभा मतदारसंघात चंद्रपूर, बल्लारपूर, राजुरा, वरोरा आणि यवतमाळ जिल्ह्यातील वणी आणि आर्णी विधानसभा मतदारसंघांचा समावेश आहे. सहा पैकी तीन विधानसभा क्षेत्रात भाजपचे वर्चस्व असताना सुधीर मुनगंटीवार यांना स्वतःच्या मतदार संघात भरीव असे मतदान मिळाले नाही तर वणीचे आमदार संजीव बोंदगुरवार व आर्णीचे डॉ. संदीप धुर्वे यांच्या मतदार संघात ही मुनगंटीवार पिछाडीवर असल्याने भविष्यात विधानसभा निवडणुकीत पराभवाला सामोरे तर जावे लागणार नाही ना अशी चर्चा आता रंगू लागली असून भाजपला चिंतन , मंथन करण्याची गरज असल्याचे बोलल्या जात आहे .



आधुनिक काळात शेतकरी प्रगत झाला. शेतातील आपलें उत्पन्न वाढविण्यासाठी वेगवेगळ्या उपाययोजना करू लागला.पाणी वेळेवरआणि मुबलक मिळावा यासाठी नागभीड तालुक्यातील कोर्धा येथील एका शेतात बोर मारतांना शेतकरी. छाया :प्रणय बांगरे.

# गोंडपिपरी पोलिसांनी रोखली तेलंगणात होणारी जनावरांची तस्करी

## तीन ट्रकसह आरोपी ताब्यात:४२ लाखांचा मुद्देमाल जप्त ;१०० जनावरांची सुटका

**गोंडपिपरी । सुरज माडूरवार**

गोंडपिपरी पोलिसांनी मंगळवारी सकाळी पाच वाजता दरम्यान भंगाराम तळोधी मार्गावर कारवाई करत महाराष्ट्रातून तेलंगणा राज्यात अवैधरीत्या जनावरांची तस्करी करणाऱ्या तीन ट्रक जप्त करून एकूण १०० जनावरांची सुटका केली.याप्रकरणी एका आरोपीला अटक करण्यात आली असून ४२ लाख ४५ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.दोन चालक पळून जाण्यात यशस्वी ठरले. एक आरोपी ताब्यात सापडला असून मुसाब अली खान गडचांदूर असे अटकेतील आरोपीचे नाव आहे.
गोंडपिपरी पोलीसांना मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारावर छत्रपती शिवाजी चौकात ठाणेदार रमेश हत्तिगोटे यांनी पोलीस सहकारी कोसनशिले,मनोहर मत्ते,गणेश पोदाळी,प्रशांत नेताम,सचिन मोहुरले, कुडमेथें या





सहकाऱ्यांसह सापळा रचला तस्करांना कारवाई होणार असल्याचे संकेत मिळताच त्यांनी आड मार्ग निवडत गोंडपिपरी मार्गे न येता विठ्ठलवाडा मार्गे भंगाराम तळोधी कडे ट्रक वळविले पोलिसांनी माहिती मिळताच सिनेस्टाईल पाठलाग करून ट्रक क्रमांक एम एच ३२ बी ९५८४, एम एच ४० बी एल ७१८६, एम एच ३४ बी जी ८८२४ वाहन थांबवून तपासणी केली असता १०० जनावरे आढळून आले.जनावरे दाटीवाटीने वाहनात कोंबून निर्दयीपणे वाहतूक केली जात होती. याप्रकरणी आरोपी विरोधात पोलिसांनी महाराष्ट्र पशु संरक्षण, प्राण्यांचा छळ प्रतिबंधक अधिनियमानुसार आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. ठाणेदार हत्तीगोटे यांनी गोंडपिपरी पोलीस स्टेशनचे सूत्रे हाती घेतल्यापासून गेल्या सहा महिन्यात चार मोठ्या कारवाया करत यापूर्वी १५० जनावरांची सुटका केली हे विशेष.

# सत्तेच्या उंबरठ्यावर गेलेल्या भाजपला आम्ही खाली खेचल्याशिवाय राहणार नाही–उद्धव ठाकरे

**मुंबई । प्रतिनिधी**

लोकसभा निवडणुकीसाठी ०४ जून ला मतमोजणी पार पडली. यामध्ये महाराष्ट्रात भाजपचा धुव्वा उडाला आहे. यात महाविकास आघाडीच्या काँग्रेस, उद्धव ठाकरे आणि शरद पवार यांनी जवळपास ३० जागांवर विजय मिळवला आहे.
यानंतर उद्धव ठाकरे यांनी डरकाळी फोडत भाजपला आता सत्तेत येऊ देणार नसल्याचे म्हटले आहे. ते पुढे म्हणाले की, एनडीए मध्ये असलेले अनेक पक्षही भाजपला कंटाळलेले आहेत. तेही आमच्याबरोबर येतील आणि यासह अनेक अपक्ष खासदार आमच्यासोबत येणार आहे. त्यामुळे सत्तेच्या उंबरठ्यावर गेलेल्या भाजपला आम्ही खाली खेचल्याशिवाय राहणार नाही. मतमोजणीमध्ये एनडीएला काठावरचे बहुमत मिळाले आहे. त्यामळे एनडीएतील चंद्राबाबू नायूडू आणि बिहारचे मुख्यमंत्री नीतीश कुमार यांचे देशाच्या राजकारणातील महत्त्व वाढले आहे. चंद्राबाबू आणि नीतीश यांनी प्रत्येकी जवळपास २० जागा जिंकल्या आहेत. त्यामुळे पुढचे सरकार कोणाचे येणार याच्या चाव्या त्यांच्या हातात आहे.या मुद्द्यावर बोलताना ठाकरे म्हणाले की, भाजपने चंद्राबाबू आणि नीतीश कुमारांना प्रचंड त्रास दिला आहे. त्यामुळे त्यांना पुन्हा असा त्रास नको असेल तर ते हे उंबरठ्यावरील सरकार येऊ देणार नाहीत.दरम्यान महाराष्ट्रात महाविकास आघाडीच्या माध्यमातून उद्धव ठाकरे यांची शिवसेना, शरद पवारांची राष्ट्रवादी आणि काँग्रेसने एकत्रित निवडणूक लढवली होती. यामध्ये या तिन्ही पक्षांनी दमदार कामगिरी करत भाजप आणि त्यांच्या सहयोगी पक्षांचा धुव्वा उडवला आहे.यामध्ये अनपेक्षितपणे काँग्रेस १३ जागा जिंकत राज्यातील सर्वात मोठा पक्ष ठरला आहे. तर उद्धव ठाकरे ९ आणि शरद पवार यांच्या पक्षाने आतापर्यंत ८ जागा जिंकल्या आहेत.दुसरीकडे देशातही इंडिया आघाडीने दमदार कामगिरी केली असून भाजप आणि एनडीएला ३०० जागांच्या खाली रोखले आहे. एनडीए आतापर्यंत २९४ जागांवर आघाडीवर आहे. तर, इंडिया आघाडी २३५ जागांवर आघाडीवर आहे.सध्याची परिस्थिती पाहता एनडीएला सरकार स्थापन करण्यासाठी मोठी कसरत करावी लागणार आहे. भाजप गेल्या काही वर्षांत मित्र पक्षांबरोबर जशी वागत आहे ते पाहता सत्ता स्थापन करताना त्यांच्यासमोर मोठी आव्हाने असणार आहेत.असे उद्धव ठाकरे यांनी पत्रकार परिषदेत सांगितले




# काय सांगते, दी आऊटलूक टॉक ?

**दरवर्षी ५ जून हा दिवस जागतिक पर्यावरण दिन म्हणून साजरा केला जातो. पर्यावरणाची गुणवत्ता वाढवणे, समस्या व संवर्धनाविषयी जागरूकता निर्माण करणे आणि पर्यावरणविषयक निर्णय घेण्याची क्षमता निर्माण होण्यास पोषक वातावरणाची निर्मिती करणे, हे पर्यावरण दिन साजरा करण्यामागचे मुख्य हेतू आहेत. पर्यावरण– एन्व्हायर्नमेंट हा शब्द मूळ फ्रेंच शब्द एन्व्हायर्न या शब्दापासून तयार झाला आहे. एन्व्हायर्न म्हणजे सर्राऊंडिंग ऑर एन्सर्कल होय. सजीव–निर्जीव यांच्यामधील क्रिया–प्रतिक्रिया व आंतरक्रियांमधून साकार झालेली सजीवाच्या सभोवतालची परिस्थिती म्हणजे पर्यावरण होय. याविषयीची बरीच ज्ञानवर्धक माहिती या लेखातून अवश्य घ्या... संपादक.**

पर्यावरणाचे आपल्याभोवती असणे आपण गृहीत धरून होतो. मागील काही दशकांपर्यंत त्यातील विविध घटकांची हानी करत आलो आहोत. परंतु पर्यावरणाचा समतोल ढासळण्याचे परिणाम दैनंदिन जीवनातही जगभर दिसून आले. त्यामुळे याबाबत जागृती करण्याची गरज उत्पन्न झाली. सन १९७२ साली युनोच्या सर्वसाधारण सभेने मानव व पर्यावरण याविषयी आयोजित केलेल्या परिषदेत पर्यावरण दिन साजरा करण्याचे ठरविले. संयुक्त राष्ट्रसंघाच्या पर्यावरणविषयक कार्यक्रमातून पर्यावरण संरक्षण आणि संवर्धनासाठी राजकीय, औद्योगिक तसेच सर्वसामान्य नागरिकांच्या पातळीवर कृतिशील सहभाग मिळविण्याचे उद्दिष्ट ठेवले गेले. त्यानुसार शाश्वत विकासावर भर देण्यात येत आहे. पर्यावरण संरक्षणाचे स्थान आणि त्यांच्या संवर्धनाची गरज लक्षात घेऊन शंभर पेक्षाही जास्त सहभागी देशांमध्ये विविध प्रकल्प राबविले जात आहेत. कारण निसर्गातील सजीवांच्या अनेक अन्नसाखळ्या तुटण्याच्या स्थितीला पोहोचल्या आहेत. अनेक सजीव पृथ्वीवरून कायमचे नष्ट झाले आहेत व होत आहेत. प्रदूषण वाढत आहे. हवामान बदलत आहे. या सर्व स्थितीला आधुनिक मानवाची बेफिकीर जीवनशैली कारणीभूत आहे. सन २०५०मध्ये जगाची लोकसंख्या तब्बल ९.६ अब्ज असण्याची शक्यता आहे. चंगळवाद भागवण्यासाठी मानवाने निसर्गाला ओरबाडणे असेच चालू ठेवले तर त्यावेळी पृथ्वीवर जगणेच मुश्किल होईल, असा इशारा पर्यावरणतज्ज्ञांनी दिला आहे!

बिलिसी येथे भरलेल्या पर्यावरणविषयक परिषदेत पर्यावरण शिक्षणाची अशी तत्त्वे निश्चित करण्यात आली– १) पर्यावरणीय शिक्षणात सामाजिक तंत्रज्ञानाविषयक आणि नैसर्गिक पर्यावरणाचा एकत्रितपणे विचार व्हावा.२) पर्यावरण शिक्षण ही एक जीवनभर चालणारी शिक्षणप्रणाली असावी, ज्यात शाळापूर्ण शिक्षण, औपचारिक आणि अनौपचारिक शिक्षण यांचा समावेश असावा. ३) अध्ययनकर्त्यांला पर्यावरणाचा प्रत्यक्ष अनुभव घेण्यासाठी नियोजन व अंमलबजावणी करण्याची संधी द्यावी. ४) पर्यावरण शिक्षणाचा उपागम– अप्परौच आंतर विद्याशास्त्रीय असावा. त्यातून विद्यार्थ्यांचा पर्यावरणविषयक एकसंध व संतुलित दृष्टिकोन निर्माण व्हावा. ५) वास्तव जीवनाशी निगडित समस्या याच पर्यावरण शिक्षणाच्या केंद्रस्थानी असाव्यात. ६) पर्यावरणविषयक सकारात्मक दृष्टिकोन व मूल्यनिर्मिती करणे ही या शिक्षणाची महत्त्वपूर्ण उद्दिष्टे असावीत. ७) प्रमुख पर्यावरणीय प्रश्नाची उकल स्थानिक, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय सहकार्यातून करावी. आज पर्यावरण शिक्षणातील जागरूकता, ज्ञान, दृष्टिकोन, कौशल्य आणि सहभाग ही उद्दिष्टे साध्य करण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार दि.१८ डिसेंबर २००३ रोजी पर्यावरण शिक्षणाचा आराखडा तयार करण्यात आला. सदर आराखड्यात प्रत्येक शालेय स्तरावर पर्यावरण शिक्षणाची उद्दिष्टे व पाठ्यक्रम ठरविण्यात आले आहेत. दरवर्षी ५ जून हा दिवस जागतिक पर्यावरण दिन म्हणून साजरा केला जातो. पर्यावरणाची गुणवत्ता वाढवणे, समस्या व संवर्धनाविषयी जागरूकता निर्माण करणे आणि पर्यावरणविषयक निर्णय घेण्याची क्षमता निर्माण होण्यास पोषक वातावरणाची निर्मिती करणे, हे पर्यावरण दिन साजरा करण्यामागचे मुख्य हेतू आहेत. पर्यावरण– एन्व्हायर्नमेंट हा



**संकलन व सुलेखन**
**श्री कृष्णकुमार गो. निकोडे गुरुजी.**
**पोटेगावरोड, गडचिरोली,**
**फक्त मधुभाष– ७१३२७९६६८३.**

शब्द मूळ फ्रेंच शब्द एन्व्हायर्न या शब्दापासून तयार झाला आहे. एन्व्हायर्न म्हणजे सर्राऊंडिंग ऑर एन्सर्कल होय. सजीव–निर्जीव यांच्यामधील क्रिया–प्रतिक्रिया व आंतरक्रियांमधून साकार झालेली सजीवाच्या सभोवतालची परिस्थिती म्हणजे पर्यावरण होय. पहिल्या महायुद्धानंतर मानवाच्या निसर्गावरील आघाताचे परिणाम शास्त्रज्ञांच्या लक्षात आले. त्याचप्रमाणे औद्योगिक क्रांतीच्या फळांबरोबर त्याचे दूरगामी गंभीर परिणाम मानवाला भेडसावू लागले. म्हणून इ.स.१९६०मध्ये पर्यावरणशास्त्र किंवा पर्यावरण विज्ञान हे विषय अभ्यासासाठी स्वतंत्रपणे लागू करण्यात आले.

मानव हा पर्यावरणाचाच एक कुशाग्र घटक आहे. मात्र पर्यावरणाच्या प्रत्येक घटकात मानवी हस्तक्षेप वाढत चालला आहे. म्हणून पर्यावरणीय आपत्तीचे शास्त्रीय पद्धतीने अध्ययन व त्यावर परिणामकारक उपाययोजना करण्यासाठी शिक्षण महत्त्वपूर्ण बनले आहे. आज आपण पर्यावरणाचा अभ्यास तीन भागात करत आहोत– पर्यावरण विज्ञान, पर्यावरण शिक्षण आणि पर्यावरण तंत्रज्ञान ते हे होत. पर्यावरण विज्ञान यामध्ये तत्त्व, सिद्धांत व जैविक–अजैविक घटकांमधील आंतरक्रियांचा अभ्यास आपण करत आहोत. पर्यावरण शिक्षणात परिसंस्था– रचना, कार्य, संरक्षण व संवर्धन, जैवविविधता, प्रदूषण, पर्यावरणीय आपत्ती– मानवी व नैसर्गिक, जैवलोकसंख्या, पर्यावरणाचा धारणक्षम निरंतर शाश्वत विकास आणि पर्यावरणीय संस्थांच्या भूमिका व कार्याचा ऊहापोह आपण या अभ्यासात करत आहोत. यामध्ये मृदावरण, जीवावरण, जलावरण व वातावरण या सर्व घटकांचाही समावेश आहे. पर्यावरणाच्या अभियांत्रिकी शाखांमधून पर्यावरणातील विविध तत्त्व, संबोधक आणि सिद्धांतासोबतच विविध पर्यावरणातील घटकांचे विश्लेषण, तत्त्वज्ञानाचे उपयोजन आणि पर्यावरण संरक्षण व संधारणासाठी नवनवीन तंत्रज्ञानाचा वापर कसा करावा, या संदर्भात मार्गदर्शन केले जाते. जॉर्ज पर्किन व मर्श यांनी त्यांच्या सन १९०७च्या मॅन अँड नेचर या पुस्तकात मानव व नैसर्गिक साधनसंपत्तीचा वापर आणि त्याचे विपरीत परिणाम यावर चर्चा केली आहे. त्यांचे हे पुस्तक पर्यावरण शिक्षण देणारे पहिले पुस्तक ठरते. सन १८९९मध्ये पॅट्रिक गेडेस यांनी दी आऊटलूक टॉक या नावाची संस्था स्थापन केली. या संस्थेचे कार्य पर्यावरण शिक्षण सुधारणा असे होते. पर्यावरण शिक्षणातून जाणीव जागृती करून पर्यावरणाचा ऱ्हास थांबवणे यासाठी सन १९६५मध्ये पर्यावरण शिक्षण हा विषय शिक्षणशास्त्रात समाविष्ट करण्यात आला, तर सन १९७०मध्ये पॅरिस येथे भरलेल्या पहिल्या आंतरराष्ट्रीय परिषदेत शालेय शिक्षणात पर्यावरण शिक्षणावर भर देण्यात आला. जून १९७२मध्ये स्टॉकहोम येथे भरलेल्या संयुक्त राष्ट्रसंघाच्या पर्यावरण परिषदेत जागतिक पर्यावरणाचे संरक्षण व संवर्धन करण्याची जबाबदारी मानवाचीच असल्याचे म्हटले आहे. त्यानुसार आंतरराष्ट्रीय पर्यावरण शिक्षण कार्यक्रम अमलात आणला व त्याची उद्दिष्टे ऑक्टोबर १९७५मध्ये बेलग्रेड येथील कृतिसत्रात ठरविण्यात आली. पर्यावरण शिक्षण यात पर्यावरणाविषयी ज्ञान, आकलन, कौशल्य, जागृती आणि प्रत्यक्ष अनुभव घेऊन प्रत्येकाने आपली सकारात्मक मनोभूमिका निर्माण करते. तसेच पर्यावरण शिक्षण ही एक सातत्यपूर्ण जीवनभर चालणारी प्रक्रिया आणि हे शिक्षण सर्व शालेय स्तरावर औपचारिक व अनौपचारिक स्वरूपात असेल; जेणेकरून पर्यावरणविषयक एकसंध आणि संतुलित दृष्टिकोन प्रत्येक मानवामध्ये निर्माण होईल. आपल्या देशात पर्यावरणाची गुणवत्ता विकसित करणे, जनतेमध्ये पर्यावरण संरक्षणाची व संधारणाची ऊर्मी निर्माण करणे आणि निर्णय घेण्याची पात्रता विकसित करणे, ही पर्यावरण शिक्षणाची मुख्य ध्येये ठरविण्यात आली. त्यासाठी माणसाने पर्यावरण सुरक्षित तर मानव अस्तित्व अबाधित, हे आधी लक्षात घेतले पाहिजे.

!! आंतरराष्ट्रीय पर्यावरण दिनाच्या निमित्ताने समस्त मानवजातीला सजग होण्यास सप्ताहभर हार्दिक शुभेच्छा !!

# वृक्ष तोडाल तर माणसं कोसळतील

# जागतिक पर्यावरण दिन

**दरवर्षी जगभर ५ जून रोजी जागतिक पर्यावरण दिन साजरा केला जातो आणि पर्यावरणाच्या रक्षणासाठी जागरूकता आणि कृतीला प्रोत्साहन देण्यासाठी संयुक्त राष्ट्राचे प्रमुख साधन आहे. सृष्टी हे सजीव व निर्जीव वस्तुचे मिश्रण आहे, झाडे ही जीवन आहे. सृष्टीकर्त्याने जीवनाचे मिश्रण अशा प्रकारे केले आहे की, ते सृष्टीच्या जीवनचक्राला संतुलीत ठेवते. कोणत्याही सजीव निर्जीव रचनेसोबत मनुष्याने केलेल्या छेडछाडीचे परिणाम संपूर्ण जीवन सृष्टीला भोगावे लागतात. वृक्षवल्ली हा या सृष्टीचा खरा आधार आहे. तेव्हाच राज्य हिरवेगार होईल आणि आपण प्रदुषण विरहित वातावरणात स्वच्छंद श्वास घेवू यासाठी सर्वांनी कटीबध्द राहावे, कारण तो जीवकी प्राण आहे झाडे लावा आणि जगवा व अमूल्य असे जीवन वाचवा.**



जागतिक पर्यावरण दिन हा सार्वजनिक पोहोचण्यासाठी एक जागतिक व्यासपीठ आहे, ज्यामध्ये दरवर्षी १४३ हून अधिक देशांचा सहभाग असतो. दरवर्षी, कार्यक्रमाने व्यवसाय, गैर–सरकारी संस्था, समुदाय, सरकार आणि ख्यातनाम व्यक्तींना पर्यावरणीय कारणांचे समर्थन करण्यासाठी एक थीम आणि मंच प्रदान केला आहे. पर्यावरणाच्या संरक्षणासाठी आणि संवर्धनासाठी यादिवशी वेगवेगळे पर्यावरण विषयक जागरूकता आणि कृती कार्यक्रम आयोजित केले जातात. जागतिक पर्यावरण दिवस या दिवशी त्या गोष्टी बद्दल जागरूक केले जाते. ज्यांचा जगावर आणि पर्यावरणावर सकारात्मक आणि नकारात्मक परिणाम होतात. हा दिवस पर्यावरणाचे रक्षण आणि संवर्धन करण्याच्या आपल्या जबाबदारीचे आपल्याला जाणीव आणि दृष्टिकोन देतो.आजच्या दिवशी म्हणजेच ५ जून रोजी जगभर पर्यावरण दिवस अगदी थाटामाटाने साजरा केला जातो. त्यादिवशी पुढील जीवनातील परिस्तिथी किती बिकट होईल ते पाहता त्यासाठी जागतिक पर्यावरण दिवस साजरा केला जातो. प्रत्येक ठिकाणी उपक्रम करून भाषणे करून, झाडे लावा उपक्रम राबवून पुढील धोका टाळण्याचे आज कार्य केले जाते. यासर्वांतूनच या दिवसाची जागरूकता निर्माण होते. आपल्या मातेसमान पृथ्वी आहे आणि तिच्या पर्यावरणाची काळजी सर्वांनी घ्यावी. जवळपास पाच दशकांपासून जागतिक पर्यावरण दिन जागरूकता वाढवत आहे, कृतीला समर्थन देत आहे आणि पर्यावरणासाठी बदल घडवून आणत आहे. जागतिक पर्यावरण दिनाची थीम ग्रीन सिटीज होती आणि घोषणा होती प्लॅन्ट फॉर द प्लॅनेट! २००५ ला साध्य केली. विषय वाळवंट आणि वाळवंटीकरण होता आणि वाळवंटात कोरडवाहू नको असे घोषवाक्य होते. २०११ च्या जागतिक पर्यावरण दिनाचे आयोजन भारताने केले होते. दिवसाचे यजमानपद भूषवण्याची भारताची ही पहिली वेळ होती. २०११ ची थीम 'फॉरेस्ट्स – नेचर अॅट युवर सर्व्हिस' होती. समुद्र किनारा स्वच्छता, मैफिली, प्रदर्शने, चित्रपट महोत्सव, सामुदायिक कार्यक्रम, वृक्षारोपण आणि बरेच काही यासह जगभरात हजारो उपक्रम आयोजित केले गेले. भारतात नरेंद्र मोदी यांनी जागतिक पर्यावरण दिन साजरा करण्यासाठी आणि पर्यावरणासाठी जनजागृती करण्यासाठी कदंबचे रोपटे लावले. भारत येथे जागतिक पर्यावरण दिनानिमित्त उपक्रम २०१८ ची थीम बीट प्लास्टिक पोल्युशन होती. यजमान राष्ट्र भारत होता. ही थीम निवडून, प्लास्टिक प्रदूषणाचा मोठा भार कमी करण्यासाठी लोक त्यांचे दैनंदिन जीवन बदलण्याचा प्रयत्न करतील अशी आशा आहे. लोक एकल–वापर किंवा डिस्पोजेबलवर जास्त अवलंबून राहण्यापासून मुक्त असले पाहिजे कारण त्यांचे गंभीर पर्यावरणीय परिणाम आहेत. आपण आपली नैसर्गिक ठिकाणे, आपले वन्यजीव आणि आपले स्वतःचे आरोग्य प्लास्टिकपासून मुक्त केले पाहिजे. भारत सरकारने २०२२ पर्यंत भारतातील सर्व प्लास्टिकचा एकच वापर दूर करण्याचे वचन दिले आहे.औद्योगीकीकरण आणि शहरीकरणांच्या प्रक्रियेत प्रदुषणाची समस्या देखील अधिक तीव्र होत आहे. त्यामुळे आरोग्याचे प्रश्न निर्माण होत आहेत. पर्यावरणाला या हानी पासुन वाचविण्यासाठी मोठया प्रमाणात वृक्षारोपण होणे गरजेचे आहे. त्यादृष्टिने वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे। ही सर्वश्रेष्ठ तुकाराम महाराजांची शिकवण आचरणात आणुन अख्या महाराष्ट्रात व्यापक प्रमाणात वृक्षरोपणाचा उपक्रम हाती घेतला पाहिजे. एकीकडे वृक्षरोपणाचा गाजावाजा करीत झाडे लावली जातात परंतू नंतर त्याची निगा राखली जात नाही. मृतपाय अवस्थेत ती झाडे असतात ही शोकांतीका आहे. तेव्हा राज्यात मोठया शहरातील महानगर पालीका, नगर पालीका, ग्राम पंचायती, नगर परिषदा यांना वृक्षरोपणाचा उपक्रम राबविण्यासाठी सक्ती केली पाहिजे. कारण राज्याच्या प्रमुख शहरातील वृक्ष तोड सारखी वाढते आहे. त्यामुळे शहरातील सौंदर्यीकरण व सुशोभीकरण असलेले शहरे वृक्ष नसल्यामुळे पार शहरे बकाल होत चाललेली आहेत. त्यामुळे पर्यावरणात सारखी वाढ होत आहे. जिकडे–तिकडे प्रदुषण पाय पसरवित असल्यामुळे आरोग्य असुरक्षीत आहे. वाढते शहरीकरण आणि औद्योगीकीकरणामुळे निर्माण होणारा नैसर्गीक असमतोल दुर करण्यासाठी तसेच स्वच्छ व हरीत पर्यावरणाच्या निर्मीतीसाठी प्रकल्पाची संकल्पना शासनाने साकारली पाहिजे.जमीन मोकळी करण्यासाठी राजकिय आंधळेपणाचा आणि हव्यासातून आलेल्या आततायीपणाचा शासनामार्फत बुलडोजर सैरावैरा वृक्ष छाटीत निघाला आहे. पण पर्याय शोधला नाही उलट सिमेंट रस्त्याची भर त्यामुळे वातावरण दुषित होणं स्वाभाविक आहे. घरं रचली जातील, अहो पण वृक्ष नसतील तर माणसं कोसळतील त्याचं काय ? या जाणीवेनं वृक्ष वाचवा यासाठी संघर्ष समिती तयार करण्याची गरज आहे. 'झाडे लावा आणि झाडे जगवा'. नुसतं झाडं लावून भागणार नाही तर त्याची निगा राखली पाहिजे, जपवणुक केली पाहिजे. तेव्हा कुठे पर्यावरणाला बाधा होणार नाही तर सृष्टी नटलेली दिसेल बहर आलेला असेल अशावेळी झाडाची काळजी घेतली नाही तर वसुंधरेचं वाळवंट व्हायला वेळ लागणार नाही. तेव्हा 'झाडे लावा आणि झाडे जगवा' हा मंत्र प्रत्येक नागरिकानं आत्मसात करुन येणाऱ्या पावसाळ्यात एक तरी झाड लावून आपलं कर्तव्यपणाला लावावे, जेणेकरुन पर्यावरण दिन साजरा करण्याचं सार्थक होईल.



**प्रविण बागडे**
**नागपूर**
**९९२३६२०९१९**

## चौकशी करणारे किती स्वच्छ आहेत?:ससूनच्या कारभाराशी टिंगरे यांचा संबंध काय?, पुणे हिट अँड रनवरून अंबादास दानवेंचा सवाल

**पुणे**–पुणे हिट अँड रनप्रकरणी चौकशी करणारे किती स्वच्छ आहेत? असा सवाल विधानपरिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी केला आहे. तसेच आमदार सुनील टिंगरे यांचा अपघाताशी संबंध काय? ते पोलिस ठाण्यात का जाणून बसले होते? असेही अंबादास दानवे यांनी म्हंटले आहे. याप्रकरणी त्यांनी तपास करण्याची मागणी केली आहे. पुणे अपघाताप्रकरणी चौकशीसाठी नेमलेली समिती मंजूर नसल्याचे म्हणत अंबादास दानवे यांनी ट्विट केले आहे.आपल्या ट्विटमध्ये अंबादास दानवे यांनी पुणे प्रकरणी अनेक सवाल उपस्थित केले आहेत. ''सरकारने पुण्यातील ससून रुग्णालयाच्या डॉक्टरांची चौकशी करण्यास नेमलेल्या तिघांच्या समितीचे अध्यक्षपद जेजे रुग्णालयाच्या अधिष्ठाता डॉ. पल्लवी सापळे यांच्याकडे दिले. मुळात डॉ. सापळे या कमिशन घेतल्याशिवाय औषधी, यंत्रसामुग्री खरेदीच्या कागदावर सही करत नाहीत, असा आरोप सत्ताधारी पक्षाच्या आमदार यामिनी जाधव यांनी यापूर्वी केला होता. यावर चौकशी समिती नेमण्याचे सरकारने विधानसभेत घोषणाही केली होती. ससून प्रकरणी चौकशीच्या फेऱ्यातील व्यक्ती नेमणे म्हणजे सरकारच्या हेतू वर शंका आणणारे आहे? ही चौकशी समिती आम्हाला मंजूर नाही. चौकशीसाठी निवृत्त न्यायमूर्तींच्या मार्फत करण्यात यावी'', असे अंबादास दानवे यांनी म्हंटले आहे.पुढे अंबादास दानवे यांनी म्हंटले आहे की, ''उलट सापळे यांच्यावरील आरोपांचे पुढे काय झाले, हे सरकारने सांगावे. हे असले अधिकारी नेमून हेच सिद्ध होते की पुणे प्रकरणी सरकार अजूनही गंभीर नाही. असे अधिकारी नेमले असतील तर तपासा अंती काय समोर येईल, हे कोणीही आत्ताच सांगू शकेल.. त्याला चौकशीच्या ड्रामा करण्याची गरज नाही'', असे अंबादास दानवे यांनी म्हंटले आहे.तसेच आमदार सुनील टिंगरे यांच्याबाबत देखील अंबादास दानवे यांनी चौकशीची मागणी केली आहे. ''मुळात ससूनचे डॉक्टर, त्यांनी इमान विकून केलेला कारभार याचा आमदार यांच्याशी काही संबंध आहे का, हे देखील तपासले गेले पाहिजे. हे आमदार अपघात झाल्यावर का पोलिस ठाण्यात जाऊन बसले होते, याचे उत्तर अजून त्यांनी दिलेले नाही! म्हणून चौकशीची व्याप्ती वाढली पाहिजे'', असे अंबादास यांनी म्हंटले आहे.



## खत आणि बियाणे यांची साठेबाजी करून शेतकऱ्यांची लूट कराल तर याद राखा–शिवसंग्रामचा इशारा

**आष्टी | प्रतिनिधी**

आगामी काळात खरीप हंगामात आष्टी तालुक्यात आणि परिसरात बी –बियाणे आणि खते यांचा कृत्रिम तुटवडा निर्माण करून जादा दराने बियाणे आणि खतांची विक्री केली जात असते हे तात्काळ थांबले पाहिजे.शेतकऱ्यांना योग्य दरात आणि त्यांना हवेत त्या प्रमाणात बियाणे आणि खते उपलब्ध करून द्यावीत,अशी मागणी प्रसिद्धी प्रसिद्दी पत्रकाद्वारे शिवसंग्राम चे तालुकाध्यक्ष ज्ञानेश्वर चौधरी यांनी केली आहे .सध्या लवकरच महाराष्ट्रात मान्सून दाखल होणार आहे असा अंदाज हवामान खात्याने वर्तवला आहे त्याच पार्श्वभूमीवर तालुक्यातील शेतकरी पेरणीसाठी धावपळ करत असतात याचा फायदा घेऊन अनेक कृषी सेवा केंद्रातून शेतकऱ्यांची लुबाडणूक होत करून जुन्या खताचा साठा असतानाही तो साठा न दाखवता वाढीव दराने सर्रास खत विक्री केली जात असते. खरिपाच्या पेरणीसाठी आवश्यक असलेल्या बियाणांसाठी ही शेतकऱ्यांना ताटकळत ठेऊन बाजारात खतांची आणि बियाण्यांची कृत्रिम टंचाई निर्माण केली जाऊ शकते. या बाबीकडे महसूल प्रशासन आणि कृषी खात्याने गांभीर्याने लक्ष देणे गरजेचे आहे.अनेक कृषी सेवा केंद्रामध्ये शेतकरी आणि विक्रेते यांच्यामध्ये वाद होत असतात. हे थांबले पाहिजेत.शेतकऱ्यांना न्याय मिळाला पाहिजे.अशी मागणी चौधरी यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केली आहे

एकीकडे दुष्काळ जन्य परिस्थितीमुळे, पिकांना योग्य भाव मिळत नसल्याने शेतकरी अगोदरच अडचणीत सापडला आहे. त्याचे जीवन विस्कळीत झाले आहे.असे असताना या जगाचा पोशिंद्यालाच लुबाडण्याचे पाप व्यापारी करत असतात.शेतकऱ्यांना हव्या असलेल्या खतांच्या ऐवजी इतर खतांची विक्री करण्यासाठी कृषी केंद्र व व्यापारी आग्रही आसतात. तसेच शेतकऱ्यांना हव्या असलेल्या कंपनीच्या बियाणे ऐवजी इतर कंपन्यांची बियाणे विकण्यासाठी कृषी सेवा केंद्र प्रयत्न करत असल्याची ओरड शेतकऱ्यांमधून होत असते.बहुतांश वेळा बोगस बियाणांमुळे अनेक शेतकऱ्यांना दुबार पेरणीच्या संकटाला सामोरे जावे लागले आहे. त्यामुळे आर्थिक बोजा सहन करावा लागला.तसेच उत्पादनातही घट झाल्याने तेथे ही तोटा सहन करावा लागला. अशा दुहेरी संकटात शेतकरी भरडला गेला होता. त्यामुळे आता शेतकऱ्यांना विश्वासहर्ता असलेल्या कंपन्यांचीच बियाणे हवी आहेत. मात्र व्यापाऱ्याकडून इतर बियाण्यांसाठी आग्रह केला जात असेल शेतकऱ्यांनी ताबडतोब शिवसंग्रामशी संपर्क साधावा असे आवाहन चौधरी यांनी केले आहे. अडला हरी..... म्हणतात त्याप्रमाणे पेरणीच्या लगबगीत मिळेल ते बियाणे घेण्याकडे काही शेतकऱ्यांचा ओढा आहे. मात्र अशा बियाणांमुळे जर नुकसान झाले तर त्याला जबाबदार कोण? असाही प्रश्न निर्माण होतो आहे. या सर्व शेतकऱ्यांच्या अडचणीचा विचार करून शासन आणि प्रशासनाने तातडीने भरारी पथक तयार ठेवून शेतकऱ्यांना न्याय देण्याच्या भूमिकेतून कार्य करावे.अशी आग्रही मागणी शिवसंग्रामचे ज्ञानेश्वर चौधरी करण्यात येत आहे.

# अहिल्यादेवी होळकर सांस्कृतिक महोत्सव उत्स्फूर्त प्रतिसादाने रंगला





**अहमदनगर | प्रतिनिधी**

विचार भारती व उत्कर्ष फौंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने अहिल्यादेवी होळकर सांस्कृतिक महोत्सवाचेआयोजन नगर मध्ये माउली सभागृह, सावेडी येथे करण्यात आले आहे तो नगरकरांच्या उत्स्फूर्त प्रतिसादाने रंगला यामध्ये नृत्य झंकार प्रिया ओगले-जोशी आणि विद्यार्थी प्रस्तुत स्त्री शक्तीवर आधारित नृत्य कार्यक्रम व सुरेखा डावरे निर्मित अंजली नृत्यालय प्रस्तुत शक्ती रूपेण संस्थिता स्त्री शक्तीवर आधारित नृत्य कार्यक्रम झाला त्यानंतर अहिल्यानगरचे सुपुत्र, महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध शिवशाहीर डॉ.विजय तनपुरे यांनी पोवाडा सादर केला, नादसंगम फ्यूजन प्रस्तुत मराठी, हिंदी, पंजाबी व ब्रज भाषेतील प्रसिद्ध गीतांची मैफल झाली, महाराष्ट्रातील आघाडीच्या युवा गायिका नगरभूषण तसेच इंडियन आयडॉल फेम अंजली आणि नंदिनी गायकवाड यांची सुमधुर गायन मैफल होऊन पुण्यश्लोक अहिल्यादेवी(एक धगधगत अधिकुंड)हि नाटिका ,नाटच आराधना,अहिल्यानगर यांनी सादर केली. यामध्ये नगरच्या कलाकारांनी सादर केलेल्या नृत्य, गायन व नाटिकेतून अहिल्याबाईंचा जागर करत रसिकांची मने जिंकली. या कार्यक्रमास जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा शालिनी विखे, इंजिनिअर डी. आर. शेंडगे, उल्का गवते, माजी नगरसेविका शारदा ढवण , महोत्सवाचे निमंत्रक बलभीम पठारे, सुधीर लांडगे, अनिल मोहिते व अशोक गायकवाड, उत्कर्ष फौंडेशनचे अध्यक्ष डॉ. अशोक भोजने आदींसह अनेक मान्यवर उपस्थित होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. ऐश्वर्या सागडे यांनी केले.कार्यक्रम यशस्वीतेसाठी अरूण कुलकर्णी, बलभीम पठारे,सुधीर लांडगे प्रसाद सुवर्णपाठकी ,अनिल मोहिते ,इंजि.राजेंद्र तागड, राजेंद्र पाचे,चंद्रकांत तागड,डॉ.अशोक भोजने,रवींद्र बारस्कर, प्रमोद कांबळे, पवन नाईक,प्रा.ऐश्वर्या सागडे, अनंत जोशी, शशिकांत नजन, ओंकार देऊळगावकर, मकरंद खरवंडीकर, किरणडीडवाणीया, सुनंदा तागड , सुरेखा डावरे, प्रिया ओगले जोशी,संगीता पाचे , उत्तरा पंडित यांच्यासह स्वागत व नियोजन समितीने प्रयत्न केले

# नादसंगम फ्युजन कार्यक्रम संपन्न




**अहमदनगर | प्रतिनिधी**

विचार भारती व उत्कर्ष फाउंडेशन आयोजित.अहिल्यादेवी होळकर सांस्कृतिक महोत्सवात नादब्रह्म संगीतालय, प्रस्तुत. पवन श्रीकांत नाईक निर्मित नादसंगम-फ्युजन हा मराठी, हिंदी, पंजाबी व ब्रज भाषेतील प्रसिद्ध गीतांची मैफल संपन्न झाली त्यास प्रेक्षकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला यावेळी माजी महापौर बाबासाहेब वाकळे,निमंत्रक बलभीम पठारे,सुधीर लांडगे,अनिल मोहिते आदी उपस्थित होते .. या कार्यक्रमात विशेष सहभाग सरोज पालडीया यांचा होता यामध्ये साथसंगत करणारे कल्याण मुरकटे व पवन नाईक (संवादिनी),स्मिता राणा(सतार),महेश लेले(व्हायोलिन),कुलदीप चव्हाण(बेंजो),शेखर दरवडे(तबला),रुद्र कुलकर्णी(डर्बूके व काहून),प्रणव देशपांडे (सिंथेसाईझर)होते तर सहवादक- अनुज दरवडे,सहगायक-श्रेयस शिंत्रे,नवरतन वर्मा,पवन तळेकर,विजय जाधव,निनाद पारखी,मुलांशू परदेशी व संकेत गांधी हे होते तर निवेदक सुनील मधुकर कात्रे यांनी केले .मैफलिची सुरुवात महिला सबलीकरण या आशेचे प्रत्युषा(एक नवी पहाट)हे मराठी भाषेतील गीताने झाली.हे गीत अहिल्यानगरचे कवी संजोग धोत्रे यांनी लिहीले व संगीत पवन नाईक यांचे होते.ब्रज भाषेतील अहीर भैरव रागातील पारंपारिक बंदिश अलबेला सजन आयोरी या रचनेत नाईक सरांबरोबर सरोज पालडीया गायिकेने रंगत भरली.मिराबाईंची रचना सासोंकी मालाने प्रभू राम व कृष्ण दर्शन घडविले.सिंधी-पंजाबी भाषेतील झूलेलाल गीत बैरागी राग गीताने हिदूस्तानी सिंधु संस्कृतीच्या स्मृती उजागर केल्या.अहिल्यादेवींची आठवण व कार्य कर्तृत्वाची जाण देत तेरे वाजो ह्या गीताने मैफलिची सांगता झाली.

### हरदिन मॉर्निंग ग्रुपच्या वतीने देण्यात आल्या शुभेच्छा

# दक्षिण आफ्रिकेतील कॉम्रेड्स मॅरेथॉनसाठी जाणाऱ्या शहरातील धावपटूंचा सत्कार

## नगरचे धावपटू दक्षिण आफ्रिकेतही शहराचे नाव उंचावतील-संजय सपकाळ

**अहमदनगर | प्रतिनिधी**

जगातील सर्वात जुनी व अवघड असणाऱ्या दक्षिण आफ्रिकेतील कॉम्रेड्स मॅरेथॉनसाठी रवाना होणारे शहरातील धावपटू गौतम जायभाय, योगेश खरपुडे, जगदीप मक्कर व रवी पत्रे यांचा हरदिन मॉर्निंग ग्रुपच्या वतीने सत्कार करुन मॅरेथॉनसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

भिंगारच्या भगवान गौतम बुध्द जॉगिंग पार्क येथे हरदिनचे संस्थापक अध्यक्ष संजय सपकाळ यांनी धावपटूंचा सत्कार केला. यावेळी संजय सपकाळ, दिलीपराव ठोकळ, सुमेश केदारे, मनोहर दरवडे, दीपक धाडगे, अविनाश पोतदार, अशोकराव पराते, अविनाश जाधव, सर्वेश सपकाळ, सचिन चोपडा, सुभाष पेंढुरकर, रमेश वराडे, विकास भिंगारदिवे, नामदेवराव जावळे, अशोक दळवी, जालींदर अळकुटे, नवनाथ वेताळ, अभिजीत सपकाळ, अशोक लोंढे, सखाराम अळकुटे, सुंदरराव पाटील, विलासराव तोतरे, विठ्ठल राहिंज, राजू कांबळे, आसाराम बनसोडे, एकनाथ जगताप, शेषराव पालवे, दिनेश शहापूरकर, दिलीप बोंदर्डे, विशाल बोगावत, संतोष लुणिया, रमेश कोठारी,



कुमार धतुरे, रुपेश झोडगे, रामदास घडसिंग, प्रकाश भिंगारदिवे, विकास निमसे, अजय खंडागळे, शिवांश शिंदे, भाऊसाहेब गुंजाळ, आदिनाथ वैराळ, विशाल भामरे, उंडे मेजर, भरत डंगोरे आदी उपस्थित होते.

संजय सपकाळ म्हणाले की, शहरात खेळातून आरोग्याप्रती जागरुकता निर्माण होत आहे. नागरिकांचा देखील मैदानावर येण्याचा कल वाढत आहे. निरोगी व सदृढ आरोग्यासाठी मैदानी खेळाची गरज निर्माण झाली आहे. जागतिक दर्जाच्या मॅरेथॉन स्पर्धेत नगरचे धावपटू शहराचे नाव उंचावणार असल्याचा विश्वास व्यक्त केला. यावेळी उपस्थित जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष येरेकर, छावणी परिषदेचे मुख्यकार्यकारी अधिकारी विक्रांत मोरे, उद्योजक गौरव फिरोदिया व अतिरिक्त पोलीस अधीक्षक प्रशांत खैरे यांनी धावपटूंना कॉम्रेड्स मॅरेथॉनसाठी शुभेच्छा दिल्या.

कॉम्रेडस मॅरेथॉन स्पर्धा डर्बन ते पिटर्स मॅरिअटझबर्ग या दोन शहराच्या ८६ किलोमीटरच्या खडतर अंतरादरम्यान होणार आहे. यामध्ये भारत देशातूनही मोठ्या संख्येने धावपटू सहभागी होणार आहेत. खरपुडे, मक्कर, जायभाय हे जिल्ह्यासाठी प्रथमच स्पेशल बॅक टू बॅक कॉम्रेड्स फिनीशर पदक आणण्याचे स्वप्न घेऊन जात आहेत. त्यांनी २०२३ ला मॅरेथॉन पूर्ण करून मेडल मिळवले होते. कॉम्रेड्स मॅरेथॉनला सलग दोन वर्ष सहभाग नोंदविल्यास स्पेशल प्रिसिएशन मेडल दिला जातो. सोबत रवी पत्रे हे त्यांच्या पहिल्या मॅरेथॉनसाठी जात आहेत. या स्पर्धेत चांगली कामगिरी करण्याचा संकल्प चारही धावपटूंनी व्यक्त केला.या मॅरेथॉन स्पर्धेला वैभवशाली इतिहास असून, १९२१ मध्ये ही स्पर्धा घेण्यात आली. दरवर्षी ही स्पर्धा पहिल्या महायुध्दातील सैनिकांच्या स्मृती प्रित्यर्थ घेण्यात येते. या मॅरेथॉनचे हे ९७ वे वर्ष आहे. शारीरिक क्षमतेचा कस लावणाऱ्या व कमी-अधिक तापमानाचा मोठा प्रभाव असलेल्या या स्पर्धेत रनर्सला स्वत:ला सिध्द करावे लागणार आहे.

# मुंबईत पुढील ४ दिवस कोसळणार पाऊस मराठवाडा, विदर्भातही पावसाची शक्यता

**पुणे**-मुंबईसह उपनगरात पुढील ४ दिवस पावसाची शक्यता आहे. याशिवाय येत्या २४ तासांत मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी विजांच्या कडकडाटासह हलका ते मध्यम पाऊस पडण्याची शक्यता आहे. राज्यातील काही ठिकाणी तापमानाचा पारा चाळीशीच्या पुढे गेला आहे. त्यामुळे नागरिकांना प्रचंड उकाड्याचा सामना करावा लागतोय. मात्र आता पुन्हा एकदा राज्यात पावसाची शक्यता असल्याने मिळण्याची शक्यता आहे.पहाटेपासून उकाड्याची जाणीव होत असल्याने मुंबईकर हैराण झाले आहेत. दरम्यान, पुढील तीन-चार मुंबईसह उपनगरात ढगाळ वातावरण राहण्याचा अंदाज आहे. त्याचबरोबर आजपासून ४ दिवस हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पावसाची शक्यता आहे. महाराष्ट्रातील इतर जिल्ह्यांना देखील पावसाचा इशारा देण्यात आला आहे.भारतीय हवामान खात्याच्या अंदाजानुसार, येत्या २४ तासांत मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी विजांच्या कडकडाटासह हलका ते मध्यम पाऊस पडण्याची शक्यता आहे. पुणे, रत्नागिरी, रायगड, कोकण, सोलापूर, सातारा, सांगली, कोल्हापूर जिल्ह्यांत पावसाचा अंदाज आहे. अहमदनगर, नाशिक, जळगाव, छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, धुळे, नंदुरबार, पालघर, ठाणे जिल्ह्यातही पावसाचा अंदाज हवामान खात्याने वर्तवला आहे.दरम्यान, मान्सूनबाबत देखील एक महत्वाची अपडेट समोर आली आहे. पुढील तीन ते चार दिवसांत केरळमध्ये मान्सून दाखल होण्याचा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. केरळमध्ये मान्सूनसाठी अनुकूल परिस्थिती निर्माण होत असल्याची माहिती हवामान खात्याने दिली आहे. तर महाराष्ट्रात जून महिन्याच्या पहिल्या आठवड्यात मान्सूनचे आगमन होण्याचा अंदाज आहे.याशिवाय जून महिन्यात विदर्भ आणि मराठवाड्याच्या तुलनेत कोकण आणि दक्षिण महाराष्ट्रात पावसाचा जोर जास्त राहण्याचा अंदाज आहे. जूनमध्ये एल-निनो निष्क्रिय अवस्थेत जाईल. जुलै ते सप्टेंबर या काळात ला-निना स्थिती सक्रिय होईल. याचा परिणाम म्हणून जून ते जुलै या पहिल्या टप्प्यापेक्षा ऑगस्ट ते सप्टेंबर या मोसमी पावसाच्या दुसऱ्या टप्प्यात अधिक पाऊस पडण्याचा अंदाज आहे. १० ते १२ जूनला मुंबईत पावसाचे आगमन होणार, असा अंदाज वर्तवण्यात आला आहे.



# आयुष्यमान भारत योजना विकास प्रक्रीयेचा भाग-ना.विखे पाटील







**अहमदनगर | प्रतिनिधी**

आरोग्य क्षेत्रात मोठी गुंतवणूक करून पायाभूत सुविधा अधिक बळकट करण्याचे काम पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देशामध्ये सुरू आहे.आयुष्यमान भारत योजनेची अंमलबजावणी विकास प्रक्रियेचा भाग असल्याचे प्रतिपादन महसूल तथा पालक मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी केले.शहरातील दिनदयाळ प्रतिष्ठान परीवार,दिनदयाळ नागरी सहकारी पतसंस्था आणि सुरभी रुग्णालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या सर्वरोग निदान शिबीराचे उद्घाटन मंत्री विखे पाटील यांच्या उपस्थितीत करण्यात आले.जिल्हा संघचालक वाल्मिक कुलकर्णी पंतसंस्थेचे चेअरमन वसंत लोढा सुरभी रुग्णालयाचे चेअरमन अनिरूध्द देवचक्के माजी महापौर बाबासाहेब वाकळे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.पतसंस्थेने सभासदांकरीता सुरू केलेल्या हेल्थ कार्ड योजनेचा शुभारंभ यानिमिताने करण्यात आला.या उपक्रमाबद्दल मंत्री विखे पाटील यांनी संस्थेच्या सर्व पदाधिकार्याचे अभिनंदन करून आज आरोग्य सुविधेचा वाढत्या खर्चाचे सर्वात मोठे आव्हान समाजासमोर आहे.यासाठी आयुष्यमान भारत योजना सुरू करून यामाध्यमातून पाच लाख रुपयांपर्यत मोफत उपचार देण्याची अंमलबजावणी होत आहे.राज्य सरकारने महात्मा फुले जनआरोग्य योजना सुरू त्यामध्येही सर्व अटी काढून पाच लाख रुपयांपर्यत उपचार मोफत देण्यात येतील.यामध्ये काही ग्रामीण भागातील रूग्णालय चालकांनी बेडची अटीमध्ये बदल करण्याच्या केलेल्या मागणीबाबत राज्य सरकार निश्चित विचार करेल असे विखे पाटील म्हणाले.देशात आज आरोग्य सुविधला विकासाचा भाग बनविण्यात आले असून आरोग्य सुविधेला बळकटी देण्यासाठी मोठी गुंतवणूक होत असल्याचे मंत्री विखे पाटील म्हणाले.

### लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेब यांची पुण्यतिथी साजरी

# अविरत संघर्ष यात्री लोकनेते गोपीनाथराव मुंढे तरुणाचे प्रेरणास्त्रोत.–आमदार संतोषराव बांगर

**हिंगोली । पंडितराव तिडके**

येथील श्री संत भगवान बाबा प्रतिष्ठान व समस्त मुंडे साहेबावर प्रेम करणारी नागरिक यांच्या वतीने महाराष्ट्राचे सुपुत्र व अविरत संघर्ष यात्री स्वर्गीय लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाप्रसंगी हिंगोली विधानसभेचे आमदार तानाजीराव मुटकुळे, कळमनुरी विधानसभेचे आमदार संतोषरावजी बांगर ,माजी नगराध्यक्ष बाबारावजी बांगर राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष बि. डी बांगर, प्राचार्य डॉ. विलास आघाव, प्रतिष्ठानचे अध्यक्ष मेजर पंढरीनाथ घुगे, श्रीराम बांगर, गणेश बांगर, विश्वासरावजी बांगर, उमेश गुठे, संजय दराडे, प्रतिष्ठानचे सर्व पदाधिकारी व मुंडे प्रेमी नागरिक बहुसंख्येने उपस्थित होते.



स्वर्गीय लोकनेते गोपीनाथरावजी मुंडे यांच्या पुण्यतिथीनिमित्त आमदार तानाजीरावजी मुटकुळे यांनी श्रद्धा सुमन अर्पित केले. आपले विचार व्यक्त करताना माणसांमध्ये मी देव पहिला असून ते गोपीनाथरावजी मुंडे होते ते माझं दैवत असून आज हिंगोली विधानसभेमध्ये कार्य करण्याची संधी माझ्यासारख्या सर्वसामान्य कुटुंबातील व्यक्तीला देऊन जनमानसात सेवा करण्याची संधी त्यांच्यामुळे मला मिळालेले आहे त्यांच्या जाण्यामुळे महाराष्ट्रच नव्हे भारत राजकारणात अतिशय उत्तम व्यक्तिमत्व काळाने आपल्यापासून हिरावून घेतलेला आहे अशा भावना व्यक्त करत लोकनेते गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांना त्यांनी विनम्र अभिवादन केले.

पक्षीय राजकारण बाजूला ठेवून सर्व पक्षातील जाणत्या व्यक्तिमत्त्वाच्या विचारांचा वारसा जपणार व्यक्तिमत्व तसेच जाती आणि धर्मांच्या भीतीपलीकडे माणसाला माणूस म्हणून समजून घेऊन राजकारणात सर्वसामान्यांना आणणारा व्यक्ती प्रत्यक्ष पाहण्याचा व त्यांच्या कार्याचा अभ्यास करण्याचा मला योग आला युवकांचे ते प्रेरणास्त्रोत होते.सामाजिक व राजकीय जबाबदारी पूर्ण करताना विचाराचा वारसा जपण्याचा प्रयत्न करीत असतो. लोकनेते गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांच्या सारखा संघर्ष यात्री आता होणे नाही अशा भावना व्यक्त करून कळमनुरी विधानसभेचे आमदार संतोषरावजी बांगर यांनी साहेबांना विनम्र अभिवादन केले. ग्रामीण भागातील सर्वसामान्यांचे प्रश्नाची जाण असणारा व्यक्तीने केंद्रीय मंत्री पदाची शपथ घेतल्यानंतर देशाच्या ग्रामीण भागात विकासाची गंगा पुरवण्यासाठी सज्ज झालेला व्यक्ती ३ जून २०१४ रोजी काळाने हिरावून घेतला त्या व्यक्ती गेल्यापासून आज पावतो प्रत्येकाच्या मनात स्वकर्तृत्वाने घर निर्माण करून अमरत्व मिळवलेली व्यक्तिमत्व म्हणजे लोकनेते गोपीनाथरावजी मुंडे आहेत. या पुण्यतिथीनिमित उपस्थित सर्वांनी विचारांची जोपासना करावी आणि जातीय व सामाजिक सलोखा निर्माण करण्याचा प्रयत्न तरुण व नेतृत्व यांनी करावा असे भावना व्यक्त करत कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप मेजर पंढरीनाथ घुगे यांनी तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. मुरलीधर जायभाये , आभार संजय बांगर व कार्यक्रमाचे प्रास्ताविक एकनाथ कुटे यांनी केले. विनम्र अभिवादन करण्यासाठी श्री संत भगवान बाबा प्रतिष्ठानचे उपाध्यक्ष एकनाथराव कुटे, कैलाश बांगर, प्रा.मुरलीधर जायभाये, संजय बांगर, गोपाल बांगर, पिंटू नागरे, बालाजी घुगे, विलास आघाव , अमित पाटील ,मनोज बांगर,प्रणव गीते अभय घुगे

नितिन घुगे, विनोद बांगर, विनोद बांगर,ज्ञानेश्वर बांगर, संजय घुगे, भागवत बांगर, सचिन बांगर,ओम बांगर, उमेश पाटील, मारोतराव घुगे, गजानन बांगर, गजानन सांगळे,फड सर, दराडे सर, विनोद गिते, विठ्ठल बांगर, माधव बांगर, गजानन मुंडे, मारोतीकाका बांगर, वल्लभ मुसळे, संदीप बांगर, निखिल बांगर, मधुकर बांगर, फकिरा कांदे, आनंद बांगर , महेश बांगर, अमोल बांगर, अर्जुन बांगर,योगेश घुगे, पार्थ कुटे ,गोविंद कागणे, सचिन दराडे,गोविंद दहिफळे, सांगळे, शंकरराव बांगर, तारे, वैभव घुगे, निवास कुटे, राहुल घुगे व आदी शेकडो तरुणांनी गोपीनाथराव मुंडे यांना उपस्थित राहून विनम्र अभिवादन केले.

## उत्तर मध्य मुंबई मतदारसंघातून प्रा.वर्षा गायकवाड यांचा ऐतिहासिक विजय – सुरेशचंद्र राजहंस

### प्रा. वर्षा गायकवाड यांच्या विजयाने काँग्रेस व महाविकास आघाडीच्या कार्यकर्त्यांमध्ये उत्साह



**करंजवडे । प्रतिनिधी**

इकबाल पीरजादे मुंबई विभागीय काँग्रेसच्या अध्यक्ष प्रा. वर्षा गायकवाड यांनी उत्तर मध्य मुंबई लोकसभा मतदारसंघातून भाजपा उमेदवाराचा दणदणीत पराभव करून ऐतिहासिक विजय मिळवला आहे. याच मतदारसंघातून लोकनेते एकनाथराव गायकवाड यांनी २००४ च्या लोकसभा निवडणुकीत विजय संपादन केला होता. यावेळी त्यांच्या कन्या वर्षा गायकवाड यांनी विजय मिळवला आहे. प्रा. वर्षा गायकवाड यांच्या विजयाने काँग्रेस व महाविकास आघाडीच्या कार्यकर्त्यांमध्ये उत्साह निर्माण झाला असून ही तर परिवर्तनाची सुरुवात आहे, अशी प्रतिक्रीया काँग्रेस प्रवक्ते व मुंबई स्लम सेलचे अध्यक्ष सुरेशचंद्र राजहंस यांनी दिली आहे.

काँग्रेसचे ज्येष्ठ नेते एकनाथराव गायकवाड यांनी २००४ च्या लोकसभा निवडणुकीत याच मतदारसंघातून विजय मिळवता होता व देशात डॉ. मनमोहनसिंह यांच्या नेतृत्वाखाली युपीएचे सरकार आले होते. आजच्या विजयाने २००४ च्या निकालाची पुनरावृत्ती केली आहे. एकनाथराव गायकवाड यांच्याप्रमाणेच वर्षा गायकवाड यांचाही दांडगा जनसंपर्क असून सर्वसामान्य जनतेसाठी त्या काम करत असतात. धारावीच्या आमदार या नात्याने वर्षा गायकवाड यांनी स्थानिक प्रश्नांना नेहमीच न्याय देण्याचा प्रयत्न केला आहे. धारावीकरांना विस्थापित करण्याच्या षडयंत्रालाही त्यांनी कडाडून विरोध करत संघर्ष करत आहेत. शिक्षण मंत्री या नात्यानेही त्यांनी चांगले काम केले आहे. आता संसदेत मुंबईकरांच्या प्रश्नासाठी त्या आवाज उठवतील व न्याय देतील असा विश्वास आहे. राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जून खर्गे, सोनियाजी गांधी, राहुलजी गांधी, प्रियंकाजी गांधी, प्रभारी रमेश चेन्नीथला, प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, विधिमंडळ पक्षनेते बाळासाहेब थोरात व विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी वर्षा गायकवाड यांच्यावर टाकलेला विश्वास व जनतेने दाखवलेला विश्वासाला त्या तडा जाऊ देणार नाहीत, असे सांगून सुरेशचंद्र राजहंस यांनी प्रा. वर्षा गायकवाड यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## महाविकास आघाडी चे उमेदवार नागेश पाटील विजयी झाल्या मुळे शहरात पद अधिकारी कार्यकर्त्यांनी केला जल्लोष

**महागांव । संजय कोपरकर**

महागांव हिंगोली लोकसभेचे महाविकास आघाडी चे उमेदवार नागेश पाटील आष्टीकर हे विजयी होताच शहरातिल महाविकास आघाडीचे कार्यक्रते पदा अधिकारी यांमध्ये उत्सह संचारला शहरातिल छतापती शिवाजी महाराज डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या तेलचित्रा समोर चौकात फटके, अतिषबाजी करून मिठाई वाटून जल्लोश करण्यात आला या वेळी विशाल पांडे युवा सेना जिल्हा प्रमुख बांधकाम सभापती महागांव न. प. , परवेज सुरैया नगरसेवक, शिवाजी डाखोरे साहेब नगरसेवक, विनोद कोपरकर माजी नगरसेवक, धमानंद कावळे रा.कॉ. पक्षचे पदाधिकारी, प्रकाश नरवाडे, राणु कुरेशी, सोनु पाटील नरवाडे ,ओम कुसुंगवाड युवासेना तालुका प्रमुख , समाधान कदम , रवि कदम, शशि वाघमारे मोठ्या संख्येने महाविकास आघाडीचे कार्यकर्ते उपस्थित.



## शहाजीबापू पाटील रुग्णालयात दाखल

# गुडघ्यावरील शस्त्रक्रियेनंतर शिंदे पोहोचले भेटीला, रुग्णालय गाठून तब्येतीची केली विचारपूस

**मुंबई (वृत्तसंस्था)**–सांगोला विधानसभा मतदारसंघाचे आमदार शहाजीबापू पाटील यांना ब्रीच कॅण्डी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. तिथे स्वतः मुख्यमंत्री शिंदे यांनी शहाजीबापू पाटील यांची भेट घेतली आहे. यावेळी शिंदेंनी पाटलांच्या तब्येतीची विचारपूस केली आहे. दरम्यान, काही दिवसांपूर्वी पाटील यांच्या पायाच्या गुडघ्यावर शस्त्रक्रिया झाली होती. मात्र त्यावेळी शिंदे हे त्यांच्या मूळ गावी होते. त्यानंतर सोमवारी शिंदे शहाजीबापू यांच्या भेटीसाठी रुग्णालयात पोहोचले.शस्त्रक्रिया यशस्वी झाल्यानंतर शिंदे यांनी फोनवरून शहाजीबापू पाटील यांची चौकशी केली होती. त्यानंतर आज रुग्णालय गाठून शिंदेंनी डॉक्टर आणि त्यांच्या नातेवाईकांकडून त्यांच्या प्रकृतीविषयी माहिती जाणून घेतली आहे. तसेच त्यांनी लवकरात लवकर त्यांनी पूर्ण बरे होऊन पुन्हा एकदा जनसेवेसाठी कार्यरत व्हावे अशी अपेक्षा त्यांच्याशी बोलताना व्यक्त केली आहे.दरम्यान, मुख्यमंत्री शिंदे यांनी यासंदर्भात ट्विट करत माहिती दिली आहे. त्यांनी शहाजीबापू पाटील यांच्या भेटीचे फोटोही शेअर केले आहेत. शिंदेंनी शहाजीबापू यांची प्रकृती स्थिर असल्याची माहिती दिली आहे. यावेळी शहाजीबापू पाटील यांचे कुटूंबीय आणि सहकारी तसेच मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाचे विशेष कार्यकारी अधिकारी मंगेश चिवटे हेदेखील यावेळी उपस्थित होते.



# यवतमाळ वाशिम लोकसभा मतदारसंघातून शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे संजय देशमुख विजयी

**वाशिम । प्रतिनिधी**

यवतमाळ वाशिम लोकसभा मतदारसंघाची मतमोजणी आज येथील दारव्हा रोडवरील शासकीय धान्य गोदामातील मतमोजणी केंद्रावर झाली. एकून ३० फेरीमध्ये झालेल्या या मतमोजणीत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे संजय उत्तमराव देशमुख विजयी झाले. निवडणूक निर्णय अधिकारी डा.पंकज आशिया यांच्याहस्ते त्यांना विजयी झाल्याचे प्रमाणपत्र देण्यात आले.



मतमोजणी केंद्रावर पोलिसांच्या कडक सुरक्षा व्यवस्थेत सकाळी ८ वाजता मतमोजणीस सुरुवात झाली. सुरुवातीस टपाली मतपत्रिकांची मतमोजणी करण्यात आली. त्यानंतर मतपेट्या असलेली स्ट्रागरुम उघडी करून मशीनची मोजणी करण्यात आली. एकून ३० फेऱ्यांमध्ये मतदारसंघाची मतमोजणी झाली. त्यात सर्वाधिक मते शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उमेदवार संजय उत्तमराव देशमुख यांना ५ लाख ९४ हजार ८०७ मते मिळाली.उमेदवार व त्यांना मिळालेली मते पुढील प्रमाणे, राजश्री हेमंत पाटील महल्ले (शिवसेना) ५ लाख ३३४ मते, हरिसींग (हरिभाऊ) नसरू राठोड (बहुजन समाज पार्टी) १७ हजार ३९६ मते, अनील जयराम राठोड (समनक जनता पार्टी) ५६ हजार ३९० मते, अमोल कोमावार (हिंदराष्ट्र संघ) ३ हजार ३७७, उत्तम ओंकार इंगोले (पिपल्स पार्टी ऑफ इंडिया- डेमोक्रॅटीक) २ हजार ९७५ मते, धरम दिलीपसिंग ठाकूर (सन्मान राजकीय पक्ष) ४ हजार ५५५ मते मिळाली.अपक्ष उमेदवारांना पुढीलप्रमाणे मते मिळाली. त्यात डा.अर्जुनकुमार सिताराम राठोड (अपक्ष) १ हजार ८६३ मते, प्रा.किसन रामराव अंबुरे १ हजार ७२० मते, गोकुल प्रेमदास चव्हाण १ हजार ९४ मते, दिक्षांत नामदेवराव सवाईकर १ हजार १०३ मते, नुर अली मेहमुद अली शाह १ हजार ९५८ मते, मनोज महादेवराव गेडाम २ हजार ७९४ मते, रामदास बाजीराव घोडाम ६ हजार ७८१ मते, विनोद पंजाबराव नंदागवळी ६ हजार २९८ मते, संगिता दिनेश चव्हाण ७ हजार १८० मते, संदीप संपत शिंदे ५ हजार ५१४ मते मिळाली.एकून ९ हजार ३९१ मतदारांनी नोटाला मतदान केले तर टपाली मतपत्रिकेतील एकून ७१ मते अवैध ठरली. मतमोजणी संपल्यानंतर निवडणूक निर्णय अधिकारी डा.पंकज आशिया यांनी संजय उत्तमराव देशमुख विजयी झाल्याची घोषणा केली व त्यांना विजयी झाल्याचे प्रमाणपत्र प्रदान केले. संपुर्ण मतमोजणीची प्रक्रिया अतिशय शांततेत पार पडली.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .